# मुंबई विद्यापीठ

(REG/ICC/2020-21/5)

## परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२० / प्र.क्र. ५८ / आरोग्य–५, दिनांक १४ / ०३ / २०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२० / प्र.क्र. ५८ / आरोग्य–५, दिनांक १५ / ०३ / २०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२० / प्र.क्र. ६० / २० / ताशि–१ दि. १६ / ०३ / २०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२० / प्र.क्र. ३५ / १८ (र.व का.) दिनांक १८ / ०३ / २०२०

५) संकिर्ण–२०२० / प्र.क्र. ६० / २० / ता.शि.–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९ / ०३ / २०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

७) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 25 March, 2020

८) मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. REG/ICC/2019-20/35 दिनांक ३१ मार्च, २०२०

९) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 15 April, 2020

१०) उशिसं / कोरोना / २०२० / मवि–१ / ४०९१, दिनांक १५ एप्रिल, २०२०

११) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 2 May, 2020

१२) उशिसं/२०२० /कोरोना/मवि-१ दिनांक ४ मे, २०२०

उपरोक्त संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता परिपत्रक क्र. १ ते ७ तसेच ९ व १० अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली होती व उपरोक्त परिपत्रकांतील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले होते.

मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ११ अन्वये प्राप्त अधिसुचनेनुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढयाच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ४ मे, २०२० ते १७ मे, २०२० पर्यंत कामकाज बंद (Lockdown) करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच संदर्भांकित पत्र क्र. १२ च्या अनुषंगाने उपरोक्त अधिसुचनेतील संबंधित दिशा निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने गठीत केलेल्या समितीने परीक्षा आणि शैक्षणिक दिनदर्शिकेबाबत महत्वपूर्ण सूचना, शिफारशी आणि मार्गदर्शक तत्वे निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने दिनांक ०४ ते १७ मे २०२० या तिसऱ्या टाळेबंदीचा कालावधी हा शैक्षणिक सत्र २०२०-२१ साठीच्या शैक्षणिक उपक्रमांच्या पूर्वतयारीचा कालावधी म्हणून घोषित करण्यात आला आहे. कोरोना विषाणूमुळे जागतिक पातळीवर उद्धवलेली परिस्थिती व त्याचे होणारे दुरोगामी परिणाम लक्षात घेता येणाऱ्या काळामध्ये शिक्षण क्षेत्रात देखील आमूलाग्र बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक व शिक्षण पूरक प्रशासकीय कामकाज प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञानधिष्ठित शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. त्या दृष्टीने या कालावधीमध्ये **घरी राहून ( Work From Home)** रचनात्मक अध्ययन-अध्यापनचे काम करीत असताना ई-संसाधनांचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा.

अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेत पूर्णतः डिजीटल मोडचा वापर करुन गूगल क्लासरूम, गूगल हँगआउट, सिस्को वेबॅक्स मीटिंग, यू ट्यूब स्ट्रीमिंग, ओईआर (Open Education Resources), स्वयम प्लॅटफॉर्म, स्वयंप्रभा (दूरदर्शन (फ्री डिश) आणि डिश टीव्हीवर उपलब्ध) यासारखी माध्यमे कशी उपयोगात आणता येतील याचा सर्व शिक्षकांनी विचार करावा व त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२० -२१ करिता उपयुक्त ई-संसाधने वापरण्यासंदर्भात उपरोक्त कालावधी उपयोगात आणावा. तद्वतच ई-लर्निंग मॉड्यूल विविध विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांमधील शिकविण्यात येणाऱ्या एकूण अभ्यासक्रमांच्या किमान ३० ते ५० टक्के ई-कंटेट तयार करण्यात यावेत. ज्यामध्ये ई-टेक्स्ट मटेरियल, व्हिडीओ लेक्चर्स, ऑडिओ-व्हिडीओ इंटरॅक्टीव मटेरियल, व्हर्च्युल क्लासरूम सेशन, ऑडिओ पोडकास्ट्स, व्हर्च्युअल सिमुलेशन आणि स्वयम मुल्यांकन प्रश्नावली किंवा चाचण्या यांचा अंतर्भाव करण्यात येऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने देखील उपरोक्त कालावधीमध्ये सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत.

तद्वतच संबंधित जिल्ह्यातील मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे संपर्कात राहून त्यांचे निर्देशानुसार कार्यवाही करावी. शासन परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

परीक्षांची आवेदन पत्रे व परीक्षा आयोजना संदर्भात सर्व संबंधितांना दिनांक १७ मे २०२० नंतर कळविण्यात येईल.

या संदर्भात शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशांबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

मुंबई- ४०००३२
दिनांक : ५ मे, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/ संचालक, मान्यताप्राप्त संस्था, समन्वयक आदर्श महाविद्यालये